Email - Info@maharashtracrimetimes.com

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

संपादकः- राकेश शंकर गोरे

प्रकाशन - मुंबई, एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, पुणे, सातारा, रत्नागिरी

R.N.I. No. MAHMAR/2010/33301

● वर्ष : ९ ● अंक: २९ ● पृष्ठ: ४ ● मुंबई, मंगळवार १६ ऑक्टोबर २०१८ ते सोमवार २२ ऑक्टोबर २०१८

मूल्य २/- रुपये

Website:maharashatracrimetimes.com Email-maharashtracrimetimes33301@gmail.com POSTAL REGISTRATION NO. MCN/157/2017-2019

३ | २४ तास पाणीपुरवठ्याला यंदाच्या पाणीटंचाईचा फटका

मुंबईत एअर होस्टेस विमानातून पडली! | ४



# घरपोच दारु नको, दुष्काळग्रस्तांना मदत पोहोचवा - उद्धव ठाकरे



**मुंबई (विशाल कारंडे)- महाराष्ट्राच्या जनतेला घरपोच दारू नकोय तर दुष्काळग्रस्तांना घरपोच मदत पोहचवा असं शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी सरकारला सुनावलंय. ऑनलाईन दारू हे आपल्या संस्कृतीत नाही. पण राज्याची 'शोभा' करणारा प्रयोग रोजच सुरू असून. दुष्काळग्रस्तं भागात तात्काळ मदतीची आवश्यकता आहे. दुष्काळ ग्रस्तांना मदतीच्या रांगेत उभं करून मारू नका. त्यांना घरपोच मदत करा. अशी मागणीही शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी एक पत्रक काढून केलीय.**

ऑनलाईन दारू विक्रीसाठी राज्य सरकार अनुकूल आहे असं वक्तव्य उत्पादनशुल्क मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलं होतं. त्यानंतर सरकारवर चौफेर टीका सुरू झाली. सोशल मीडियावरूनही सरकारवर टीकेची झोड उठली होती. दारू पिऊन गाडी चालविल्यामुळे अपघात होतात. ते कमी करण्यासाठी ऑनलाईन दारू विक्रीला परवानगी देण्यास सरकारची तयारी आहे अशी सरकारची भूमिका असल्याचं म्हटलं जात होतं. यातून सरकारला महसूलही मिळण्याची शक्यता होती. मात्र जनतेच्या विरोधामुळं सरकारला आपली भूमिका स्पष्ट करावी लागली.या विषयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारची भूमिका स्पष्ट करत असा कुठलाही निर्णय सरकारच्या विचाराधीन नाही आणि सरकार असा निर्णय घेणारही नाही असं स्पष्ट केलं. या निर्णयाला अनेक स्वयंसेवी संस्थांनी आणिम मान्यवरांनी विरोध केला होता. आता खुद्द शिवसेना पक्ष प्रमुखांनीच सरकारला सुनावल्याने राज्य सरकारवर नामुष्कीची वेळ आलीय. राज्य सरकार आधीच दारूला प्रोत्साहन देत असते आणि दारूबंदीचं नाटकही करतं. असे काही निर्णय घेतले तर त्यात आणखीच भर पडेल अशी तीव्र नाराजीही स्वयंसेवी संस्थांनी व्यक्त केली होती.

## मुंबई मेट्रोच्या कामांसाठी नागपूरचे ठेकेदार मागवले; शिवसेनेचा फडणवीसांवर आरोप

**मुंबई (सम्यक कासारे)-** मुंबई शहरातील कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नावरून शिवसेनेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना धारेवर धरले आहे. राज्याला पूर्णवेळ गृहमंत्री नाही. पोलिसांना पक्ष कार्यकर्त्यांचा दर्जा व पक्षातील वाल्यांना कायदा-सुव्यवस्थेचे रखवालदार बनवले गेले आहे, अशी टीका शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या 'सामना'मधून करण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वीच मानखुर्दमध्ये मेट्रोच्या कामाला विरोध करणाऱ्या शिवसेना आमदार तुकाराम काते यांच्यावर जीवघेणा हल्ला झाला होता. या पार्श्वभूमीवर शिवसेनेने देवेंद्र फडणवीस यांच्या अकार्यक्षम कारभारावर बोट ठेवले आहे. पोलिसांचा दरारा व कायद्याचा धाक असल्यानेच मुंबई आतापर्यंत सुरक्षित राहिली होती. पण गेल्या दोन-चार वर्षांत मुंबईची जास्त वाट लागली आहे. सर्वच बाबतीत मुंबईवर जे अधिकारी लादले गेले ते फक्त ओरबडण्यासाठी व वाट लावण्यासाठीच. पंतप्रधान मोदींच्या जिवास धोका असल्याची गुप्त वार्ता आमच्या पोलिसांना समजते, हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांकडे 'बॉम्ब' ठेवल्याची माहिती मिळते, पण आमदारावर हल्ले होणार आहेत किंवा रस्त्यावर कुणाला गोळ्या घालणार आहेत हे पोलिसांना कळत नाही, याचे आश्चर्य वाटते.

## दिवाळीनिमित्त रेशन दुकानावर मिळणार 1 किलो साखर, 2 किलो हरभरा डाळ; गिरीश बापटांची घोषणा

**औरंगाबाद (सुनील आढाव)-** येत्या दिवाळीत भाजप-शिवसेना सरकार गोरगरिबांना बहुतेक डाएट लाडू खाऊ घालणार असंच दिसतंय. कारण दिवाळीनिमित्त बीपीएल रेशनकार्ड धारकांना फक्त १ किलो साखर आणि २ किलो हरभरा डाळ मिळणार आहे. राज्याचे अन्न पुरवठा मंत्री गिरीश बापट यांनीच याबद्दल घोषणा केलीये. दिवाळी निमित्त कार्डधारकांना प्रति कुटुंब एक किलो साखर दिली जाणार आहे. ही साखर वाटप फक्त दिवाळीत दिली जाणार असल्याचं गिरीश बापट यांनी स्पष्ट केलं. साखरेसोबत २ किलो हरभरा डाळही दिली जाणार असल्याचं बापट यांनी सांगितलं. राज्यात स्वस्त दुकानातून साखर वाटप बंद होते. आता दिवाळीनिमित्ताने १ किलो साखर आणि २ किलो हरभरा डाळ मिळणार आहे.पण इथं प्रश्न सामान्यांना



असा प्रश्न पडलाय की, दिवाळीसाठी वाटल्या जाणाऱ्या एक किलो साखरेतून दोन किलो हरभरा डाळीचे लाडू नेमके तयार करायचे तरी कसे म्हणूनच बापट साहेबांनी या डाएट लाडूंची पाककृती गृहिणींना समजून सांगावी, अशी मागणी झाल्यास नवल वाटू नये.आज औरंगाबादमध्ये फोरटी फाईट मिठाच्या वाटपाचा शुभारंभ करण्यात आला. अन्न पुरवठा खात्याचे मंत्री गिरीश बापट आणि विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते फोरटी फाईट मिठाच्या वाटपाचा शुभारंभ झाला.आयोडीन युक्त हे मीठ स्वस्त धान्याच्याच दुकानात मिळणार आहे. दारिद्र्य रेषेखाली पिवळे रेशन कार्ड नसले तरी प्रत्येकाला हे मीठ १४ रुपये किलो प्रमाणे मिळणार आहे.दुष्काळग्रस्त भागासाठी असलेली अन्न सुरक्षा योजना अधिक सक्षमपणे राबवली जाणार आहे. दुष्काळग्रस्त भागातील एकही व्यक्ती अन्नाशिवाय उपाशी राहणार नाही असा विश्वासही गिरीश बापट यांनी व्यक्त केला.

## केवळ पुस्तक वाचून उद्योजक होता येत नाही -राज ठाकरे

**मुंबई (अमोल गुडेकर)-** केवळ पुस्तक वाचून उद्योजक होता येत नाही, असं मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी नमूद केलं. गुजराती माणूस हा हुशार आहे हे आता कळतंय, असं म्हणत राज ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना टोला लगावला. मी उद्योजक होणारच या वृत्तपत्र विक्रेत्यांकडून आयोजित कार्यक्रमाला माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी आणि राज ठाकरे एकाच मंचावर उपस्थित होते. नुसतं पुस्तक वाचून उद्योग करता येत नाही, असं यावेळी राज ठाकरे म्हणाले.यावेळी राज ठाकरे कार्यक्रमाला उशिरा आले. त्यावरुन मनोहर जोशींनी राज ठाकरेंना टोलाही लगावला. मी शिक्षक नसल्यामुळे भाषण ५ ते १० मिनिटांत आटोपणार आहे. मी व्यवसाय सांगायला आलेलो नाही. तुम्ही तुमची अर्धी लढायी जिंकली आहे कारण तुम्ही तुमचा विचार ताजमध्ये करताय. मराठी माणूस मागे आहे हा



श्रम काढून टाका. सगळ्याच मारवाडी, गुजरातींनी दुकानं टाकली आहेत का? मराठी, महाराष्ट्राने असं पोषक वातावरण तयार केलं, म्हणून मारवाडमधले लोक व्यवसायासाठी इकडे आले, असं राज ठाकरे म्हणाले.गुजराती माणूस हुशार असतो यात वाद नाही. ते आता कळतंय, असं म्हणत राज यांनी मोदींना टोला लगावला. गुजराती माणूस गुजराती माणसाला कामाला ठेवत नाही, कारण त्याचा मनात भीती असते की हा काम करणारा मोठा होईल, असं राज यांनी नमूद केलं.मनोहर जोशी म्हणतात ताज हॉटेल बांधायला पाहिजे होतं. मग का नाही बांधलं? शक्य झालं असतं. आणि पुस्तक वाचून कोणालाही धंदा करता येत नाही. ज्यांना कामधंदा नाही ते पुस्तकं काढतात, असा टोला राज ठाकरे यांनी लगावला.

## मित्राच्या आईशी अफेअर
## शेजाऱ्यांची प्रेमी युगुलाला मारहाण

**अहमदाबाद (हिंदुस्थान समाचार)-** मित्राच्या आईसोबत प्रेमसंबंध ठेवणाऱ्या तरुणाला चौघा शेजाऱ्यांनी मारहाण केली. गुजरातमधील कालोल तालुक्यात ही घटना घडली असून विजयजी ठाकोर याने चौघांविरोधात पोलिसात तक्रार दाखल केली आहे.तक्रारदार विजयजी ठाकोर याचे मित्र विरामजी ठाकोरची आई संजनाबेन हिच्याशी प्रेमसंबंध आहेत. विजयजी संजनाबेनला भेटायला गेला होता. त्यावेळी मित्र विरामजी घरी नव्हता. त्यामुळे शेजारी राहणारे जगजी शंकाजी ठाकोर, नेनाजी शंकाजी ठाकोर, अर्जनजी शंकाजी ठाकोर, माथुरजी ठाकोर संजनाबेनच्या घरी गेले आणि मित्राच्या अनुपस्थितीत त्याच्या घरी येण्याचं कारण विजयजीला विचारु लागले. संजनाबेनसोबत आपले प्रेमसंबंध असल्याचं



विजयजीने सांगताच चौघांचा पारा चढला आणि त्यांनी दोघांना काठीने मारहाण केली. मारहाणीत जखमी झालेले विजयजी ठाकोर आणि संजनाबेन ठाकोर यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.

## सहाय्यक दिग्दर्शिकेच्या आरोपानंतर विकी कौशलच्या वडिलांची माफी

**मुंबई (विशाल कारंडे)-** 'मीटू' चळवळीमुळे महिलांना आपल्यावर झालेल्या लैंगिक अत्याचाराविरोधात आवाज उठवण्यासाठी बळ मिळत आहे. वरिष्ठ अॅक्शन दिग्दर्शक आणि अभिनेता विकी कौशलचे वडील श्याम कौशल यांनी गैरवर्तन केल्याचा आरोप नमिता प्रकाश नावाच्या सहाय्यक दिग्दर्शिकेने केला होता, त्यानंतर श्याम यांनी ट्विटरवरुन जाहीर माफीनामा मागितला आहे.२००६ मध्ये आऊटडोअर शूटच्या वेळी श्याम कौशल यांनी गैरवर्तन केलं, असा दावा नमिता यांनी केला होता. 'बॉलिवूडमधील पुरस्कार विजेते अॅक्शन दिग्दर्शक श्याम कौशल आपल्या रुममध्ये वोडका पिण्यासाठी यावं, म्हणून मला आग्रह करत होते. त्यांच्या बोलण्याची पद्धत पाहता,



मी मद्यपान करतच नसल्याचं खोटं सांगितलं. मी मागणी धुडकावून लावली तरीही त्यांचा हेका कायम राहिला. तू काय मिस करत आहेस, तुला समजत नाही, असंही ते म्हणाले. शेवटी त्यांनी आपल्या फोनवर पॉर्न फिल्म सुरु केली. त्यामुळे कोणीतरी हाक मारत असल्याचं भासवून मी तिथून निघून गेले.' असं नमिता यांनी म्हटलं आहे.मी तातडीने माझ्या वरिष्ठांना घडल्या प्रकाराबाबत सांगितलं. तेव्हा, उरलेल्या दिवसात स्टंट टीमसोबत मी कधीच एकटी नसेन, याची हमी त्यांनी दिली. काही महिन्यांनंतर कार्यकारी निर्मात्यांनी माझी माफीही मागितली. मात्र हे ज्यांना समजलं होतं, त्या क्रू मेंबर्ससाठी हा तोपर्यंत चेष्टेचा विषय झाला होता' असंही नमिता यांनी सांगितलं.

## व्हॉट्सअॅपवर विरोधात मेसेज केल्याने औरंगाबादमध्ये निर्घृण हत्या

**औरंगाबाद (प्रतिनिधी)-** सोशल मीडियामुळे माणसा-माणसातील सहनशीलता किती कमी आणि संवेदनशीलता किती बोथट झालीय, याचं उदाहरणं औरंगाबादमध्ये समोर आलंय. व्हॉट्सअॅप या मेसेजिंग अॅपवर चॅटिंगदरम्यान केवळ विरोधात मेसेज केला म्हणून तलवार, चाकू, रॉड आणि लाठ्या-काठ्यांनी हल्ला करुन ३५ वर्षीय व्यक्तीची निर्घृणपणे



हत्या करण्यात आली.व्हॉट्सअॅपवर चॅटिंग दरम्यान मोईन मेहमूद पठाण यांनी विरोधात मेसेज टाकला. याचा राग मनात धरुन १५ ते २० जणांनी पठाण यांच्यावर हल्ला केला. तलवार, चाकू, रॉड आणि लाठ्या-काठ्यांनी पठाण यांच्यावर हल्ला चढवत, भर चौकात त्यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. औरंगाबादमील हर्सुलमध्ये फातेमानगर येथे रात्रीच्या वेळी ही घटना घडली.

## सौजन्य व्हॉट्सअप




## पंकजा मुंडेंची फेसबुक पोस्टः नामदेव शास्त्री, धनंजय मुंडेंना

**बीड (हर्षद परब)-** राज्याच्या ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे यांनी भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री आणि विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे यांचं नाव न घेता फेसबुक पोस्टमधून समाचार घेतला आहे. दसरा मेळाव्याच्या निमित्ताने पंकजा मुंडेंनी ही फेसबुक पोस्ट लिहिली आहे.'कोणी आपल्यावर वार केला तर त्यांच्यावर प्रतिवार करण्यात माझी सर्व शक्ती मी का लावू? त्यापेक्षा नवा डाव मांडून लोकांना सुरक्षित आणि शांत ठेवणं मला योग्य वाटलं. आपले शब्द दूषित करुन कोणावर टीकाटिप्पणी करण्यापेक्षा निर्मितीवर मी जोर देते आणि त्या दिशेने मी वाटचाल ठरवली,' असं पंकजा मुंडे यांनी लिहिलं आहेभगवान गडावरील दसरा मेळाव्यानिमित्त होणाऱ्या भाषणाला महंत नामदेव शास्त्री परवानगी नाकारल्यानंतर, पंकजा मुंडे यांनी गेल्या दोन वर्षांपासून दसरा मेळाव्यासाठी आपली राजकीय प्रतिष्ठा पणाला लावली होती. बीडमधील सावरगाव या भगवान बाबांच्या जन्मगावी गेल्या वर्षी पहिल्यांदाच दसरा मेळावा घेण्यात आला आणि



या वर्षीही याच ठिकाणी दसरा मेळावा घेण्यात येणार आहे.या पार्श्वभूमीवर पंकजा मुंडेंनी महंत नामदेवशास्त्री आणि धनंजय मुंडे यांच्यावर अप्रत्यक्षरित्या टोला लगावला आहे. त्यांनी लिहिलं आहे की, 'भक्ती आणि शक्तीचा योग्य समन्वय लोकांना ऊर्जा प्रेरणा आणि आशा देतो. ऊस तोडणाऱ्याच्या कोयत्याला धार, गरीबाच्या स्वप्नाला आधार देतो, हेच मिळतं ना दसऱ्याला..आपल्याला, मला आणि तुम्हाला. माझ्या भगवान बाबांच्या दर्शनाने व मुंडे साहेबांच्या भाषणातून इतकी ऊर्जा घेऊन जात होते लोक ती ऊर्जा त्यांच्याकडून हिरावून घेणे अशक्यच.

## वादांनंतर नवरात्रोत्सवात रमली तनुश्री दत्ता

**मुंबई (नमिता मुणगेकर)-** तनुश्री दत्ता हे एकच नाव गेल्या काही दिवसांपासून कलाविश्वात प्रचंड चर्चेत आलं आहे. बरीच वर्षे हिंदी चित्रपटसृष्टीपासून दूर राहिलेल्या अभिनेत्री तनुश्री दत्ता हिने काही दिवसांपूर्वीच एका मुलाखतीत अभिनेते नाना पाटेकर यांनी आपल्याशी असभ्य वर्तन केल्याचा आरोप केला होता. नानांवर तिने लैंगिक शोषणाचे आरोप केले. तनुश्रीने केलेल्या या आरोपांनतर कलाविश्वात बऱ्याच प्रश्नांनी आणि चर्चांनी डोकं वर काढलं. अनेक अभिनेत्रींनी त्यांना सामोरंल जावं लागलेल्या प्रसंगाविषयी वाच्यता केली. एक प्रकारे तनुश्रीच्या एक धाडसी पावलामुळे अकेजणींना प्रेरणाच



मिळाली. नानांवर आरोप केल्यानंतर असंख्य चर्चा, माध्यमांचे प्रश्न आणि त्यांना उत्तरं देण्यातून उसंत मिळाल्यानंतर तनुश्रीने नवरात्रोत्सवाचा आनंद घेतल्याचं पाहायला मिळालं.

# ऐश्वर्या राय बच्चनच्या नावे खोटे ट्वीट व्हायरल

**मुंबई (विशाल कारंडे)-** मीटू चळवळीमुळे एकीकडे महिलांना आपल्यावर झालेल्या लैंगिक अत्याचाराविरोधात आवाज उठवण्यासाठी बळ मिळत आहे, मात्र याचा गैरफायदा घेणारेही असू शकतात. अभिनेत्री ऐश्वर्या राय बच्चनने 'मी टू'चा अनुभव सांगितल्याचं खोटं ट्वीट सोशल मीडियावर व्हायरल झालं आहे. ऐश्वर्याने नाव न घेता सुपरस्टार सलमान खानकडे अंगुलीर्निदेश केल्याचं यामध्ये दिसतं.'हो, आधीच्या विखारी रिलेशनशीपमध्ये माझ्यावर अत्याचार झाला, मारहाण झाली आणि कित्येक वेळा धमकावलंही गेलं. बॉलिवूडचा सर्वात मोठा धर्मादाय माणूस जो स्वतःला ह्युमन म्हणवतो, त्याला प्रत्यक्षात अजिबात माणुसकी नाही' असं ऐश्वर्याने लिहिलं



असल्याचा खोटा ट्वीट व्हायरल झाला आहे.@ AishwaryaRai या कथित वेरिफाईड अकाऊण्टवरुन ट्वीट झाल्याचा स्क्रीनशॉट पाहायला मिळतो. मात्र ऐश्वर्या मुळात ट्विटरवर नाही. त्यामुळे तिने कुठला ट्वीट केल्याचा प्रश्नच उद्धवत नाही.सलमान आणि ऐश्वर्या १९९९ साली डेटिंग करत होते. त्यानंतर ऐश्वर्याने २००२ मध्ये सलमानसोबत ब्रेकअप करत असल्याची जाहीर वाच्यता केली होती. अविश्वास आणि सलमानचा क्रोध यामुळे नातं संपवत असल्याचं ऐश्वर्याने सांगितलं होतं. सलमान शारीरिक आणि मानसिक अत्याचारासोबत शिवीगाळ करत असल्याचा आरोपही त्यावेळी ऐश्वर्याने केला होता. सलमानने मात्र ऐश्वर्याला मारहाण केल्याचा दावा फेटाळून लावला होता.

## झारखंड सरकारच्या निर्णयाविरोधात
# जैनांचा पुण्यात मोर्चा

**पुणे (अभिजीत येरल्लु)-** झारखंड सरकारच्या निर्णयाविरोधात जैन समाजाने पुण्यात भव्य मोर्चा काढण्यात आला. झारखंड राज्यातील समेध शिखर्जी तीर्थ हे जैन धमिर्यांसाठी एक पवित्र धार्मिक स्थळ आहे. या भागाला पर्यटन क्षेत्र घोषित करुन त्याचा विकास



करण्याचा झारखंडच्या सरकारने निर्णय घेतला असून, या निर्णयाला जैन समाजाचा विरोध आहे.समेध शिखर्जी तीर्थ हे जैन धमिर्यांसाठी एक पवित्र धार्मिक स्थळ आहे. समेध शिखरजी येथे २४ जैन तीर्थकारांपैकी २० तीर्थकारांना मोक्ष प्राप्त झाला अशी मान्यता आहे. तसेच, जैन धर्मातील अनेक साधूंना इथे मोक्ष मिळाला असं जैन धर्मीय मानतात. समेध शिखर्जी तीर्थ हे जर पर्यटन क्षेत्र निर्माण झालं तर हॉटेल येतील, अनेक पर्यटक येतील, आणि त्यामुळे मांसाहार-दारु या जैन धर्मामध्ये निषिद्ध असलेल्या गोष्टींची तिथे येतील.

# बॉलिवूडचे 'बॅड बॉय' शक्ती कपूर यांची ऑडिओ क्लिप'

**मुंबई (हर्षद परब)-** अभिनेत्री तनुश्री दत्ताने अभिनेते नाना पाटेकर यांच्यावर केलेल्या गैरवर्तनाच्या आरोपानंतर देशभरात क्षशऊदद वादळ घोंघावत आहेत. या वादळात बॉलिवूड, राजकारण, क्रीडा, शैक्षणिक संस्थांसह विविध क्षेत्रातील मान्यवर या वादळात अडकले आहेत. क्षशऊदद या मोहिमेबाबत अनेकांनी आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत. आता यामध्ये आणखी एका नावाची भर पडली आहे.बॉलिवूडमध्ये नेहमीच 'बॅड बॉय' म्हणून परिचीत असलेले अभिनेते शक्ती कपूर यांनी याबाबत प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. शक्ती कपूर यांच्यावर अद्याप कोणी आरोप केलेले नाहीत, मात्र त्यांनी या अभियानावर काही प्रश्न उपस्थित करत, थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींनी यामध्ये हस्तक्षेप करण्याचं आवाहन केलं आहे. त्याबाबतची ऑ



डिओ क्लिप शक्ती कपूर यांनी एबीपी न्यूजकडे पाठवली आहे.'अशा प्रकारणांमध्ये ७० टक्क्यांपेक्षा जास्त मुली ब्रॅ कमेल करत आहेत. त्यामुळे आरोप केल्यानंतर तातडीने संबंधित व्यक्तींचं नाव जाहीर न करता, जोवर कोर्टात गुन्हा सिद्ध होत नाही, तोपर्यंत बदनामी रोखावी, मग तो कोणी कलाकार, व्यावसायिक किंवा नेता असो, कोर्टात सिद्ध झाल्यानंतरच नाव जाहीर करावं', असं आवाहन शक्ती कपूर यांनी केलं आहे.केवळ आरोप झाल्याने अनेकांचं आयुष्य बरबाद झालं आहे. त्यांचं संपूर्ण करिअरच संपतं. त्याला नोकरीवरुन हाकललं जातं. स्वत:ची बायका मुलंही त्याला संशयाने पाहू लागतात, असं शक्ती कपूर यांनी म्हटलं आहे.

# २५ वर्षांपूर्वी मलाही त्रास दिलेला -सैफ

**मुंबई (प्रतिनिधी)-** करिअरच्या सुरुवातीला मलाही त्रास दिला गेला होता, तो लैंगिक छळ नसला तरी २५ वर्षांपूर्वी झालेल्या जाचामुळे मी अजूनही संतप्त आहे, असं प्रख्यात अभिनेता सैफ अली खानने सांगितलं. इतरांच्या वेदना लोकांना समजतच नसल्याची खंत सैफने व्यक्त केली.'पीटीआय'ला दिलेल्या मुलाखतीत सैफ अली खानने आपला क्षशऊदद अनुभव शेअर केला. 'मला त्याविषयी फार काही बोलायचं नाही, कारण आजही मी तितका महत्त्वाचा नाही. माझ्यासोबत काय झालं होतं, ते आठवलं तरी माझ्या तळपायाची आग मस्तकात जाते. सध्या जे सुरु आहे, ते चांगलं आहे. लोकांना न्याय



हवा आहे. बदल घडतोय, ही सकारात्मक बाब आहे' असंही सैफ म्हणाला.१९९१ मध्ये दिग्दर्शक राहुल रवैल यांनी सैफला बेखुदी (१९९२) चित्रपटासाठी साईन केलं होतं. चित्रीकरणाचं पहिलं शेड्यूल झाल्यानंतर सैफ 'अनप्रोफेशनल' वागत असल्याचं सांगत त्याला रवैल यांनी काढलं. सिनेमात नवोदित काजोलच्या जोडीला कमल सदानाची वर्णी लागली.१९९३ मध्ये यश चोप्रा यांच्या 'परंपरा' चित्रपटातून सैफने बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं. बेखुदी चित्रपटाच्या चित्रीकरणाच्या वेळी सैफची भेट अभिनेत्री अमृता सिंगसोबत झाली. दोघं ऑक्टोबर १९९१ मध्ये विवाहबंधनात अडकले.

# मुंबईत एअर होस्टेस विमानातून पडली!

**मुंबई (विकास नालुगडे)-** मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर एक एअर होस्टेस उड्डाणापूर्वी विमानातून खाली पडल्याने जबर जखमी झाली आहे. एअर इंडियाचं दिल्लीला जाणाऱ्या एआय ८६४ या विमानाचा दरवाजा बंद करत असताना आज (१५ ऑक्टोबर) सकाळी ६ वाजून १० मिनिटांनी ही घटना घडली.



हर्षा लोबो असं या ५३ वर्षीय एअर होस्टेसचं नाव असून या घटनेत त्यांच्या पाठीच्या कण्याला फ्रॅक्चर झालं आहे. याशिवाय त्यांच्या उजव्या पायालाही दुखापत झाली आहे. त्यांना विलेपार्ले इथल्या नानावटी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. एल५ हा दरवाजा बंद करताना विमान आणि पायऱ्यांमधील गॅपमुळे हर्षा लोबो घसरुन पडल्या. यानंतर त्या बेशुद्ध पडल्या आणि त्यांना जबर दुखापतही झाली आहे. तर ही दुर्दैवी घटना असून चौकशी सुरु आहे, असं एअर इंडियाने सांगितलं आहे.'

हर्षा लोबो यांच्या अनेक चाचण्या केल्या जात आहेत. सगळ्या चाचण्या झाल्यानंतर त्यांच्यावर नेमके कोणते उपचार करायचे हे स्पष्ट होईल. त्या आमच्या इमर्जन्सी वॉर्डमध्ये आहेत,' असं नानावटी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या वतीने सांगण्यात आलं आहे.

## तुझं आडनाव हिंदू वाटत नाही, अमेरिकेत तरुणाला गरबा इव्हेंटमधून हाकललं

**मुंबई (प्रतिनिधी)-** यूएसमधील अटलांटा शहरात नवरात्रीनिमित्त श्रीशक्ती मंदिरात एका गरबा इव्हेंटचं आयोजन करण्यात आलं होतं. मात्र आडनाव हिंदू 'वाटत' नसल्याचं कारण पुढे करत बडोद्याहून अमेरिकेला शिफ्ट झालेल्या एका वैज्ञानिकासह तिघा जणांना बाहेर हाकलण्यात आलं. २९ वर्षीय करण जानीने ट्वीट करुन हा आरोप केला आहे.करण जानी हा वैज्ञानिक २०१६ मध्ये गुरुत्वलहरींचा शोध घेणाऱ्या यूएसमधील 'लिगो' टीमचा भाग होता. मूळ बडोद्याचा असलेला करण काही वर्षांपूर्वी अटलांटामध्ये स्थायिक झाला.



गेल्या सहा वर्षांपासून तो श्रीशक्ती मंदिरात गरबा खेळण्यासाठी जातो, मात्र इतक्या वर्षांत असा अनुभव आला नसल्याचं त्याने सांगितलं.'तुम्ही हिंदू दिसत नाही. आयडीवरील तुमची आडनावं हिंदू वाटत नाहीत.

# मोदी सरकारच्या ४ वर्षात भूकबळीत मोठी वाढ, केंद्र सरकार नापास

***नवी दिल्ली (कमलेश वैष्णव)- भूकबळी संपविणाऱ्या देशांच्या यादीत भारत आणखी पाठीमागे पडला आहे. ग्लोबल हंगर इंडेक्स २०१८ (GHI) चा अहवाल जारी करण्यात आला आहे. त्यानुसार ११९ देशांच्या यादीत भारत १०३ व्या स्थानावर आहे. विशेष म्हणजे गतवर्षी या यादीत भारत १०० व्या स्थानावर होता. त्यामुळे, मोदी सरकार देशातील भूकबळी कमी करण्यात अपयश ठरत असल्याचे दिसून येत आहे.***



केंद्रातील मोदी सरकारला देशातील भूकबळी समस्या आव्हान ठरताना दिसत आहे. कारण, ग्लोबल हंगर इंडेक्समध्ये भारत सातत्याने मागे पडत आहे. भूकबळी संपविणाऱ्या देशांच्या या यादीत २०१४ साली भारत ५५ व्या स्थानावर होता. त्यानंतर, सन २०१५ मध्ये हे स्थान ८० पर्यंत जाऊन पोहोचले होते. तर २०१६ मध्ये ९७ आणि २०१७ मध्ये १०० अशी घसरण भारताची झाली आहे. मात्र, यंदा म्हणजेच २०१८ मध्ये भारत या यादीत १०३ व्या क्रमांकावर पोहोचला आहे. तर या यादीत पाकिस्तान १०६ व्या क्रमांकावर आहे. पण, ज्या देशासोबत भारत स्पर्धा करतो, तो चीन या यादीत २५ व्या स्थानावर आहे. त्यामुळे गेल्या ४ वर्षांचा अभ्यास केल्यास, देशातील भूकबळी संपविण्यात मोदी सरकारला अपयश आल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

ग्लोबल हंगर इंडेक्सकडून जागतिक, राष्ट्रीय आणि क्षेत्रीय स्तरावरील भूकबळीचे आकलन करण्यात येते. भूकबळी कमी करण्याच्या लढाईतील प्रगती आणि समस्यासंदर्भात दरवर्षी एक सर्वेक्षण केले जाते. देशातील किती नागरिकांना गरजेनुसार जेवण मिळत नाही, याचा अहवाल या संस्थेकडून तयार केला जातो. म्हणजे, देशात किती प्रमाणात कुपोषण आहे, याचा अभ्यास या संस्थेकडून केला जातो. त्यामध्ये ५ वर्षांपेक्षा कमी वयाच्या किती चिमुकल्यांचे वजन आणि उंची त्यांच्या वयापेक्षा कमी आहे. तसेच यामध्ये बालमृत्यू दर किती, हेही तपासले जाते.

## १ डिसेंबरपर्यंत मोबाईल नंबर रजिस्टर करा
# नाहीतर SBI बंद करेल 'नेट बँकींग' सुविधा

**नवी दिल्ली (लहू कदम)-** स्टेट बँक ऑफ इंडियाने नुकतीच एक महत्त्वाची घोषणा केली आहे. आपल्या खातेदारांपैकी जे खातेदार इंटरनेट बँकींग सुविधा वापरतात त्यांनी लवकरात लवकर आपला




मोबाईल क्रमांक बँकेकडे रजिस्टर करावा असे आवाहन बँकेने केले आहे. यासाठी बँकेने १ डिसेंबरपर्यंतची मुदत दिली आहे. असे न केल्यास बँक प्रशासनाकडून ग्राहकांची नेट बँकींग सुविधा बंद केली जाईल असेही बँकेकडून सांगण्यात आले आहे. बँकेने 'ऑनलाइनसेबी' या आपल्या संकेसस्थळावर ग्राहकांना ही माहिती दिली आहे. आपल्या ग्राहकांना एसएमएसेस आणि इमेल अलर्टसाठी मोबाइल क्रमांक रजिस्टर करायला सांगा, असे निर्देश रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने ६ जुलै २०१७ रोजी एका निवदनाद्वारे बँकांना दिले होते.

त्या पार्श्वभूमीवर एसबीआयने आपल्या ग्राहकांना ही सूचना दिली आहे. सध्या व्यवहार ऑनलाईन झाल्यापासून ग्राहकांकडून नेटबँकींगचा मोठ्या प्रमाणात वापर होते. ऑनलाईन व्यवहार करताना कोणतेही गैरप्रकार घडू नयेत म्हणून सुरक्षेच्या कारणास्तव बँकेने या नियमाची अंमलबजावणी करण्याचे ठरवले आहे. यासाठी ग्राहकांनी आपले खाते असलेल्या शाखेशी संपर्क करणे आवश्यक असल्याचेही बँकेने म्हटले आहे.

**आपला मोबाईल क्रमांक रजिस्टर आहे की नाही असे तपासा**

१. www.onlineWi.com वर जाऊन लॉगइन करा
२. My Account and Profile वर जा
३. यातील Profile वर जा
४. यात Personal Details मध्ये मोबाईल या पर्यायावर क्लिक करा.
५. तुम्हाला प्रोफाईल पासवर्ड मागितला जाईल. हा लॉगइन पासवर्डपेक्षा वेगळा असेल.
६. योग्य पासवर्ड टाकल्यावर तुम्हाला तुमचा मोबाईल क्रमांक आणि ईमेल आयडी दिसेल.



# ओडिशात भूस्खलनाने १२ मृत्युमुखी
## चार बेपत्ता : तितली चक्रीवादळ, मुसळधार पावसानंतर नवे संकट



**भुवनेश्वर (प्रतिनिधी)- ओडिशात गजपती जिल्ह्यात तितली चक्रीवादळानंतर झालेल्या मुसळधार पावसाने भूस्खलन होऊन किमान १२ जण मृत्युमुखी पडल्याची भीती व्यक्त होत आहे. तसेच चार जण बेपत्ता आहेत.**

विशेष मदत आयुक्त बी.पी. सेठी यांनी सांगितले की, शुक्रवारी झालेल्या मुसळधार पावसानंतर काही ग्रामस्थ एका गुहेसारख्या जागेत आश्रयाला थांबले होते. गजपती जिल्ह्याच्या बरघारा गावात झालेल्या या दुर्घटनेत भूस्खलन होऊन १२ जण मृत्युमुखी पडल्याची भीती व्यक्त होत आहे. बेपत्ता चार जण ढिगाऱ्याखाली असल्याची शंका व्यक्त केली जात आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, घटनास्थळी एनडीआरएफच्या टीमला पाठविण्यात आले आहे. तथापि, अन्य भागात पाणी ओसरु लागल्याने मदतकार्याला वेग आला आहे. मुख्यमंत्री नवीन पटनायक गंजम, गजपती आणि रायगड जिल्ह्यासह अन्य प्रभावित भागांची हवाई पाहणी करणार आहेत.

सेठी यांनी सांगितले की, आतापर्यंत १,२७,२६२ नागरिकांना शिबिरांत आश्रय देण्यात आला आहे. एनडीआरएफ आणि ओडिशा डिझास्टर रॅपिड अॅक्शन फोर्सला मदतीसाठी तैनात करण्यात आले आहे. पुराचा फटका गंजम, गजपती, रायगड, पुरी, कंधमाल आणि केंद्रपाडा जिल्ह्यांना बसला आहे.

# महिलेकडून वारंवार शरीरसुखाची मागणी, तरुणाची आत्महत्या



**परभणी (रवि थोरवे)-** महिलेच्या त्रासाला कंटाळून एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. महिलेकडून वारंवार शरीरसुखाची मागणी होत असल्याने, आत्महत्या करत असल्याचा आरोप या तरुणाने सुसाईड नोटमध्ये केला आहे. सचिन मीटकरी असं आत्महत्या केलेल्या तरुणाचं नाव आहे.परभणी-वसमत रोडवर असलेल्या ब्रह्मा अपार्टमेंटमधील राहत्या घरी या युवकाने रविवारी (१४ ऑक्टोबर) रात्री केली. मोंढा पोलीस या प्रकरणाचा तपास करत असून गुन्हा दाखल केला आहे. आरोपी महिलेने पाच ते सहा दिवसांपूर्वी मृत तरुणावर ग्रामीण पोलीस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा केला दाखल होता. त्यामुळे मी स्वत:चा जीव घेत आहे. तसंच मृत्यूनंतर माझ्या कोणत्याही मित्राला त्रास देऊ नये, असं तरुणाने सुसाईड नोटमध्ये घेतली आहे. 'मी सचिन नामदेव मिटकरी असं लिहून देतो की, महिलेने माझं आयुष्य बरबाद केलं आहे. कारण तिला माहित असताना की माझं लग्न झालेलं आहे तरी सुद्धा माझ्याकडे शरीरसुखाची मागणी केली आणि मला सतत असे कर नाहीतर तुला बदनाम करेन असं सांगत असे. तिचे अजून दोन मुलांसोबत संबंध आहे आणि ती आरोपी असून माझ्यावर खोटे गुन्हे नोंद केले आहेत. त्यामुळे मी माझा जीव घेत आहे.

# नांदेड सिटीत मसाज स्पा सेंटरमधील हाय प्रोफाईल सेक्स रॅकेटचा पुणे ग्रामीण पोलिसांनी केला पर्दाफाश

**नांदेड (योगेश होळंब)-** नांदेड सिटीत सुरु असलेल्या मसाज स्पा सेंटरमधील हाय प्रोफाईल सेक्स रॅकेटचा पुणे ग्रामीण पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या कारवाई पोलिसांनी ३ परदेशी व १ परप्रांतीय युवतीची सुटका केली आहे. ही कारवाई शुक्रवारी (दि.१२) संध्याकाळी नांदेड सिटी डेस्टीनेशन सेंटर मॉल मधील आरोह स्पा मसाज सेंटरवर करण्यात आली. पुणे ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विजय चौधरी यांनी एलसीबी व हवेली पोलीस स्टेशनच्या पथकाने संयुक्तीकरित्या केली.

पोलीस उपअधीक्षक विजय चौधरी यांना नांदेड सिटी डेस्टीनेशन सेंटर मॉल येथील आरोह स्पा मसाज सेंटरमध्ये मसाजचे नावाखाली वेश्याव्यवसाय चालू असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दयानंद गावडे व हवेली पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अशोक शेळके यांचेकडील दोन पथकासह कारवाईचे नियोजन करून आरोह स्पा मसाज सेंटर येथे बनावट ग्राहक पाठवून वेश्या व्यवसाय चालत असल्याची खात्री केली. वेश्या व्यवसाय सुरु असल्याची खात्री झाल्यानंतर मसाज सेंटरवर छापा टाकून तेथे वेश्या व्यवसायासाठी आणलेल्या ३ थायलंड व १ मणिपुर येथील अशा एकूण ४ युवतींची सुटका केली. तर व्यवस्थापक टी.मावेलझुआ (रा. ललित अपार्टमेंट, नांदेड सिटी, पुणे मूळ रा.मिझोराम) यास ताब्यात घेण्यात आले आहे.




मसाज सेंटरचा मालक शरद नामदेव जाधव व व्यवस्थापक टी. मावेलझुआ दोघे संगनमताने मसाज सेंटरच्या नावाखाली तीन परदेशी व एक परप्रांतीय युवतीकडून वेश्याव्यवसाय करून घेत असल्याचे आढळून आल्याने दोघांविरुद्ध स्त्रिया व मुली अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा १९५६ चे कलम ३,४,५ अन्वये हवेली पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर कारवाईमध्ये पोलीस उपअधीक्षक विजय चौधरी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दयानंद गावडे, राजू चंदनशिव, महेश गायकवाड, निलेश कदम, दत्तात्रय तांबे, रौफ इनामदार, शेखर मगर तसेच हवेली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अशोक शेळके, उपनिरीक्षक राहुल वरोटे, शेंडगे, बाबर, देसाई, महिला पोलीस कोलते यांनी सहभाग घेतलेला आहे.

कारवाईमध्ये मिळून आलेल्या ३ परदेशी युवती भारतात कोणत्या कारणासाठी कोणत्या व्हीसावर आलेल्या आहेत? त्यांचे पासपोर्ट वैध आहेत काय? याबाबत गुन्हयाचा अधिक तपास हवेली पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अशोक शेळके हे करीत आहेत.